आपल्या बातम्या, आतल्या बातम्या...
आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# के. के. वाघतर्फे विद्यार्थी, पालक अन् शिक्षकांचा गौरव



**नाशिक :** के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात दरवर्षीप्रमाणे यंदा ही अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या अखेरच्या वर्षात शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी कॅम्पस मध्ये प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन केले जाते. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये १६५ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांनी ५५० हून अधिक विद्यार्थ्यांची प्लेसमेंटमध्ये निवड झाली आहे. विद्यार्थ्यांना सरासरी ४.८० लाख रुपयांचे वार्षिक पॅकेज मिळालेले आहे. या विद्यार्थ्यांचा संस्थेतर्फे सत्कार केला जात असतो.

गेल्या आठवड्यात के. के. वाघ अभियांत्रिकीतर्फे निवड झालेल्या ८८ विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या पालकांचे संस्थेचे जनसंपर्क संचालकअजिंक्य बाळासाहेब वाघ व प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर यांच्या हस्ते औरंगाबादकर हॉल येथे सत्कार संपन्न झाला. त्यामध्ये ५४ विद्यार्थी व ३४ विद्यार्थिनींचा समावेश आहे. या प्रसंगी विभाग प्रमुख डॉ. एस. एम. कमलापूर, डॉ. पी बी कुशारे, डॉ. पी. डी. भामरे, डॉ. आर. के. मुंजे, डॉ. सुनील कुटे, डॉ. व्ही. सी. बागल व डॉ. पी. जे. पवार हे उपस्थित होते. संस्थेतर्फे आयोजित कॅम्पस इंटरव्हयूतर्फे निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे, त्यांच्या पालकांचे आणि शिक्षकांचे श्रम आणि योगदान ओळखून त्यांचे कौतुक करण्यासाठी के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाने एक आगळा वेगळा उपक्रम हाती घेतला असल्याची माहिती संस्थेचे जनसंपर्क संचालकअजिंक्य बाळासाहेब वाघ यांनी दिली.

Nashik Edition
May 23, 2025 Page No. 5
Powered by: erelego.com